ॐ

# अध्याय बारावा

१ पार्थ पुसे जे असे मिसळले भक्त विश्व-रूपात
तरी मागुतीं तुज उपासिती सांठवुनी हृदयात १

तुझी श्रीहरी सगुण साजिरी मूर्ति अंतरीं ठसली
वृत्ति जयांची तव पदीं सदा भाव-भक्तिनें रतली २

रात्रं-दिन तीं सर्व इंद्रियें तुझें चि निरुपम रूप
सुखें भोगिती तन्मय होती तो आनंद अमूप ! ३

नित्य सुख-द तें श्रवणीं पडतें तुझें विमल गुण-गान
रंगुनि रसना करी मधुर तव नाम-सुधा-रस-पान ४

नयनीं खेळे तुझें सांवळें सगुण रूपडें जाण
अंग-सुगंधा हुंगितां सदा गुंगुनि गेलें घ्राण ५

प्रेम-भरें तुज मिठी मारितां त्वचा होतसे शांत
अखंड चित्तीं असा भोगिती देव-भक्त-एकान्त ६

जयांसि विश्वीं तूं सर्वस्वीं विश्रांतीचा ठाव
सर्वां भूतीं भगवंत चि तूं असा जयांचा भाव ७
आणि जे दुजे भक्त चि सहजें विश्व-रूपिं तल्लीन
होउनि करिती नित्य अंतरीं अव्यक्ताचें ध्यान ८
सोऽहं-भावें रत स्व-रूपीं जगद्भान विसरून
तुज उपासिती परमात्म्यातें दुजा भाव सांडून ९
रतले कोणी सगुणीं कोणां निर्गुण वाटे इष्ट
योग-युक्त ते उभय त्यांतुनी सांग कोणते श्रेष्ठ ?' १०
२ श्रीहरि सांगे, 'उपासिती जे नित्य-युक्त होऊन
मन-बुद्धीसह चित्त सर्वथा मजमाजीं रोवून ११
अढळ श्रद्धा असे जयांची अचल प्रीती सगुणीं
जाण अर्जुना, असे भक्त ते वरिष्ठ योगी मानीं. १२
३ उपासिती जे परंतु अक्षर अव्यक्त ब्रह्मातें
संयतेन्द्रिय ज्ञाते निरुते ते हि पावती मातें १३
सर्व-व्यापीं अचिंत्य अचल ध्रुव कूट-स्थ ब्रह्म
उपासिती जे ते हि ज्ञाते पावती चि मम धाम १४
४ 'नेति' 'नेति' हें वेद बोलती अनिर्देश्य तें ब्रह्म
जें उपासिती ते हि पावती मत्पदीं चि विश्राम १५
सर्वां भूतीं सम-बुद्धि तयां आत्म-सुखीं ते मग्न
म्हणुनि तयांतें आत्म-हित चि तें सर्व-भूत-हित जाण १६

५ चित्त देउनी असें चि करिती अव्यक्ताचें ध्यान
योग-साधनीं तयां साधकां कष्ट आगळे जाण १७
चित्त-निरोधी उसळुनि येती काम-क्रोध-समंध
आणि साधकां कवळुनि घेती उरे न मग निर्बंध १८
भक्तिवांचुनी आक्रमितां तो योग-मार्ग निभ्रांत
तयां पाडिती अणिमादिक त्या अष्ट-सिद्धि मोहांत १९
भक्ती सुटतां मी ज्ञाता हा अहंकार थोरावे
असा झुंजता विरळा ज्ञाता ब्रह्म-पदातें पावे ! २०
सोऽहं-सिद्धि लाभतां तया सहज घडे मत्प्राप्ति
परी साधनीं भक्ति-पथाची असे सुगमता निरुती २१
६ तरी स्व-धर्में सकल हि कर्में होती मत्प्रीत्यर्थ
मद्भक्तिपुढें तुच्छ लेखिती जे चारी पुरुषार्थ २२
होउनि मत्पर नित्य निरंतर निमग्न असती ध्यानीं
अनन्य-योगें मातें भजती असे भक्त जे कोणी २३
७ त्या मद्भक्तां उद्धरावया त्वरित धावुनी येईं
असें स्वभावें चित्त जयांचें जडलें माझ्या ठायीं २४
निज-नामाची नौका साची त्यांत बसवुनी त्यांतें
जन्म-मृत्यु-भव-सागरांतुनी नेईं पैलतिरातें २५
८ अहंकार जो मन-बुद्धीचा घेउनियां आधार
जीवा भुलवी सदा दाखवी जन्म-मरण-संसार २६

तो चि मावळे विलीन होतां ती मद्रूपीं जाण
जेविं इंद्रियें निष्प्रभ होती निघुनी जातां प्राण २७

म्हणुनि अर्जुना, मन-बुद्धि सदा तूं मद्रूपीं ठेव
होशील तरी मी चि सर्वथा निःशंक स्वयमेव. २८

९ करूं न शकसी अखंडित जरी चित्त स्थिर मद्रूपीं
सांगेन तरी अभ्यासाची युक्ति एक तुज सोपी २९

इच्छा धरुनी मत्प्राप्तीची देत जाई मज चित्त
मन-बुद्धीसह निमिषभरि तरी ह्या अष्टौ प्रहरांत ३०

संवय लागतां अभ्यासाची अशी चि थोडी थोडी
तरी हळुहळू सुटेल सहजें विषय-सुखाची गोडी ३१

क्षणोक्षणीं मग माझ्या चरणीं प्रीति तुझी वाढेल
आणि अंतरीं मत्प्राप्तीचा पूर्ण-चंद्र उगवेल ! ३२

कीं अभ्यासें असाध्य कांहीं नसे सर्वथा जाण
म्हणुनि सुबाहो, अभ्यासें हो मद्रूपीं रममाण ३३

१० तुज साधे ना अशी साधना होसी जरि असमर्थ
तरी किरीटी, करीं स्व-कर्में सर्व हि मत्प्रीत्यर्थ ३४

सहजें माळी नेइ त्या स्थळीं वळे चि जैसें पाणी
तेविं करावीं सर्व हि कर्में अहंकार सांडोनी ३५

होती ज्याच्या सत्तामात्रें विश्वाचे व्यवहार
तो मी ‘कर्ता करविता’ असें जाणुनि सर्वाधार ३६

मदर्थ पार्था कर्में करितां धरुनि भावना चित्तीं
त्या भाव-बळें गळुनि अहंता होइल तुज मत्प्राप्ति ३७

११ तुज साधे ना जरी अर्जुना, मदर्थ करणें कर्म
तरी लक्षुनी मत्प्रातीचें ध्येय धरिं असा नेम ३८

केलीं कर्में परी संयमें हेतु फलीं न धरावा
तरी हि पार्था, सुगम सर्वथा मत्प्राप्तीचा ठेवा ३९

सर्व साधनीं हेतु एक हा अहंकार निरसून
तुझें स्वभावें चित्त रहावें मद्रूपीं चि जडून ४०

१२ अभ्यास असा साध्य जसजसा होय तसतसें ज्ञान
प्रकटे साचें मद्रूपाचें, श्रेष्ठ त्याहुनी ध्यान ४१

निमग्न होतां ध्यानिं तत्त्वतां तो कर्म-फल-त्याग
सहज संभवे तदा स्वभावें शांति-सुखाचा भोग ४२

त्या शांति-सुखीं त्या मोक्ष-सुखीं त्या भक्ति-सुखीं राही
मग्न सर्वदा मद्भक्त असा देही असुनि विदेही ! ४३

१३ द्वेष कुणाचा न करी ठेवी मैत्री सर्व जगाशीं
'मी-माझें' ही अहं-भावना मुळीं न उरली ज्यासी ४४

दये-क्षमेनें भरुनी गेलें ज्याचें अंतःकरण
सुख लाभो वा दुःख हि लाभो सरिसें चि समाधान ४५

१४ निज-स्वरूपीं असे तोषली सदैव ज्याची वृत्ति
देव-भक्त हा दुजा-भाव हि मुळीं न उरला चित्तीं ४६

सोऽहं-भाव-प्रचीत येतां सहज-संयमीं झाला
आत्म-रूप जगिं एक संचलें हा दृढ निश्चय केला ४७
मदर्पण करी मन-बुद्धि तरी अपूर्व निष्ठा भजनीं
प्राणाहुनी तो प्रिय मज होतो भक्त जगीं सुज्ञानी ४८
१५ सर्वां भूतीं भगवंत असा भाव बाणला म्हणुनी
कवणातें जो नुबगे ज्यातें तेविं नुबगती कोणी ४९
विषय निमाला विश्वीं झाला विश्व-रूप जो पाहीं
म्हणुनि जयाला चित्तीं नुरला हर्ष-विषाद मुळीं हि ५०
जगतीं न दुजें ह्यास्तव सहजें निर्भय जो अक्रोधी
प्राणाहुनी तो प्रिय मज होतो पार्था, सम्यग्बोधी ५१
१६ पूर्ण-काम तो म्हणुनि अपेक्षा सहजें न करीं कांहीं
निर्मळ अंतःकरण जयाचें जणुं गंगा-जळ पाहीं ५२
भगवद्रूपीं लक्ष लागलें दक्ष साधनीं राही
लौकिक-कर्मीं वर्ततां सदा उदासीनता देहीं ५३
नच तया व्यथा जगीं तत्त्वतां सुटलें कर्माचरण
प्राणाहुनि तो मज आवडतो भक्त अर्जुना, जाण ५४
१७ आत्म-लाभ तें परम सुख जया भोग-सुखें तीं हीन
भोग-विशेषें ह्यास्तव चित्तीं जाय न जो हर्षून ५५
नाशिवंत तें गेलें त्याचा शोक न करणें युक्त
जें साचें तें वेचें ना हें जाणुनि राहे अलिप्त ५६

नच धनंजया, शुभाशुभ तया आत्मानंदीं राहे
ही रजनी वा असे दिवस हा सूर्य जाणतो का हें ? ५७
भेद नच मनीं सहजें म्हणुनी निर्मत्सरता बाणे
जगीं जगपणें असे जयाचें निःस्पृहतेनें फिरणें ५८
स्वयें चि केवळ चिद्रूप तरी निष्ठा भजनीं पूर्ण
प्राणाहुनि तो प्रिय मज होतो भक्त अर्जुना, जाण ५९
१८ जे घरचे त्यां प्रकाश द्यावा परक्यांसी अंधार
सांग पांडवा, करी का दिवा विषम असा व्यवहार ६०
पाळी अथवा गाळि तया दे ऊंस सारखी गोडी
तेविं सर्वथा शत्रु-मित्र हा भेद-भाव जो सोडी ६१
जेविं सर्वदा ऋतूंत साही राही गगन समान
तेविं जयातें सदा सारिखे मान आणि अपमान ६२
शीतोष्णादि द्वन्द्व-जन्य सुख-दुःखें सरिसीं मानी
संग-रहित जो निरंतर असे अलिप्त आत्म-ज्ञानी ६३
१९ थोर म्हणोनी स्तविला किंवा निंदिला जसा नीच
म्हणा हवें तें त्यातें कांहीं लाभ-हानि नाहींच ६४
समान निंदा-स्तुती मानुनी मुनी होउनी राही
वर्णी ना गुण-दोष कुणाचे उन्मनींत रत होई ६५
आणि मिळे तें गोड मानितो सदा आत्म-संतुष्टि
पर्जन्य पडो न पडो किंवा सागर होत न कष्टी ! ६६

गगन जेवढें असे तेवढें पवनाचें हि स्थान
तेविं तयाचें विश्व हें चि घर विश्व-रूप तो जाण ६७
म्हणुनि जयातें निराधार वा 'अनिकेत' असें म्हणती
परि तो पार्था, असे तत्त्वतां सकलाधार चि जगतीं ! ६८
आणि अंतरीं ऋद्धि-सिद्धिचा मोह जयातें नाहीं
स्व-सुखीं नांदे हर्ष-विषादें न च मति विचलित होई ६९
स्थिर-बुद्धि असा आणि त्यावरी निष्ठा भजनीं पूर्ण
प्राणाहुनि तो प्रिय मज होतो भक्त अर्जुना, जाण ७०
घेउनि हातीं मुक्ति-सुख जगा भक्ति-पथें तें देई
मुक्तीवरली भक्ति साधुनी जगीं धन्य तो होई ७१
त्या भक्तास्तव आत्मज्ञास्तव योगिवरास्तव पाहीं
सहज विदेही तरी हि सावळें सगुण रूप मी घेईं ७२
डोळे भरुनी तया पहाया अचक्षूस मज डोळे
आलिंगावें तयासि म्हणुनी रूप चतुर्भुज धरिलें ! ७३
असो अर्जुना, मद्भक्तांचें करूं किती गुण-गान
ते चि जीव कीं प्राण हि माझें सुख-सर्वस्व निधान ७४
२० जे श्रद्धेनें उपासिती हें धर्म-रहस्य यथोक्त
मद्भाव-पिसे भक्त ते तसे मजसी प्रिय अत्यंत ७५

सर्वोत्तम असा जेथें भक्ति-योग निवेदिला ।
तो हा भावार्थ गीतेचा द्वादशाध्याय संपला ॥ १२ ॥